// //

**नि.दि.दा.क्र.७७/२०११**

रामसिंग वि.डिगंबर

नि.क्र. १७७.

प्रतिवादीतर्फे सा.क्र.०२.

**शपथेवर उलटतपास पुढे सुरू...**

मला मराठी वाचता येत नाही. साक्षीदार पुन्हा सांगतो की, थोडे थोडे वाचता येते. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या पुराव्याचे शपथपत्रातील मजकुर वाचलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या पुराव्याच्या शपथपत्रातील परिच्छेद क्र.१५ मध्ये नमुद केलेल्या बाबी शाबीत करण्यासाठी माझ्याकडे कोणताही कागदोपत्री पुरावा नाही. मी त्या संदर्भातील दस्त दप्तरी दाखल केलेले नाही.

हे म्हणणे खरे आहे की, माझ्या पुराव्याच्या शपथपत्रातील परिच्छेद क्र.१६ मध्ये नमुद केल्याप्रमाणे सुमारे १०० ते १२५ वर्षापासून रस्ता अस्तीत्वात आहे हे दाखविण्यासाठी माझ्याकडे कोणताही कागदोपत्री पुरावा नाही. हे म्हणणे खरे नाही की, गट नं.२६३/२ व २६३/३ च्या मालकांनी वादांकीत रस्त्याबाबत कोणतीही तक्रार केलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर मालकांनी तक्रार केल्याबाबत दस्त दप्तरी दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, वरील मिळकतींचे मालक हे तहसिलदार यांच्यापुढे दाखल केलेल्या अर्जात पक्षकार नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, तहसिलदार यांच्या समोरील वहीवाट केस क्र.०९/२०२११ मध्ये न्यायनिर्णयामध्ये योगराज घमा पाटील व रघुनाथ पाटील यांची पक्षकार म्हणून नावे नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, वरील दोन्ही इसमांनी रस्त्याबाबत कोणतीही मागणी केली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, सदर इसमांनी रस्त्याची मागणी केली होती हे दाखविणारा दस्त दप्तरी दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, गट नं.२६१ च्या मालक इंदुबाई पाटील

व वत्सलाबाई पाटील यांनी वादांकीत रस्त्याबाबत कोणतीही तक्रार किंवा मागणी केलेली नाही.

प्रतिवादी क्र.०१ यांनी दिनांक २५.०७.२०११ रोजी रस्त्यासाठी अर्ज केला होता. परंतू सदर अर्ज कायद्याच्या कोणत्या अधिनियमान्वये दाखल केला होता हे मला माहीत नाही. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक २५.०७.२०११ च्या अर्जात मी पक्षकार नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की, सदर अर्जाचा निकाल काय झाला हे मला सांगता येणार नाही. सदर अर्ज मंजूर करण्यात आला होता. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र.०१ याने तहसिलदार यांच्याकडे केलेल्या प्रथम अर्जात ते एकटेच अर्जदार होते. हे म्हणणे खरे नाही की, तहसिलदार यांनी सदर अर्जाच्या चौकशीकामी आमचे जबाब व स्थळनिरीक्षण टिपणी तहसिल कार्यालयात नोंदविली होती. तहसिलदार आले त्यावेळेस तहसिलदार, तलाठी, मंडळअधिकारी व आम्ही सर्व त्यांचेसोबत ट्रॅक्टरमध्ये गेलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, सदर ट्रॅक्टर हे प्रतिवादी क्र.०१ च्या मालकीचे होते. सदर ट्रॅक्टर योगराज जुलालसिंग यांच्या मालकीचे होते. योगराज हा देविदास जुलालसिंग यांचा पुतण्या आहे. हे म्हणणे खरे नाही की, योगराज व देविदास यांची शेते शिरागड शिवरस्त्याने आल्यानंतर लागतात. हे म्हणणे खरे नाही की, योगराज व देविदास यांच्या शेतातुन आमचे शेत गट क्र.२६३ मध्ये येण्यासाठी पुर्वापारपासून वहीवाटीचा रस्ता आहे व प्रतिवादी क्र.०१ देखील सदर रस्त्याने आमच्या शेतात येवून पुढे त्यांच्या शेतात जातात.

मी भगवान चौधरी यांना ओळखत नाही. हे मला माहीत नाही की, भगवान चौधरी हे तहसिल कार्यालयात नोकरी होते किंवा नाही. प्रतिवादी क्र.०१ यांचे शेत मनवेल शिवारात आहे किंवा नाही हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.०१ यांच्या मालकीचे शेत हे धनसिंग रूपसिंग याच्या शेताच्या बाजूला

आहे. प्रतिवादी क्र.०१ व वादी यांच्या शेताच्यामध्ये शिवरस्ता आहे. साक्षीदार स्वत:हुन सांगतो की, वादीचे शेत शिवरस्त्यापासून लांब आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र.०१ यांचे शेतातुन शिवरस्त्याने जावून नंतर वादीचे शेतात गेल्यास माझ्या शेतात जाण्यासाठी व प्रतिवादी क्र.०१ ने नव्याने घेतलेल्या शेतात जाण्यासाठी जवळचा रस्ता उपलब्ध होतो.

हे म्हणणे खरे नाही की, मी, प्रतिवादी क्र.०१, भगवान चौधरी व इतर नातेवाईकांनी तहसिलदार यांच्याशी हातमिळवणी करून वहीवाट क्र.०९/२०११ मध्ये दिनांक ११.१०.२०११ रोजी चुकीचा निकाल घेतला. हे म्हणणे खरे नाही की, तहसिलदार यावल यांनी वहीवाट केस क्र.०९/२०११ मध्ये पर्यायी वहीवाट रस्त्याबाबत या दाव्यातील वादींकडे विचारणा केली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, वादींनी तहसिलदार यांना पर्यायी रस्ता दाखविण्याचा प्रयत्न केला तरी देखील तहसिलदार यांनी ऐकले नाही व तहसिलदार आमच्या सांगण्याप्रमाणे वागत होते. हे म्हणणे खरे नाही की, आम्हा प्रतिवादींना आमच्या शेतात जाण्यासाठी शिरागड शिवरस्त्याकडून पर्यायी रस्ता आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रस्तुत दाव्यात मी स्वत: कोणतेही दस्त दाखल केले नाही. प्रतिवादी क्र.०१ यांनी तहसिलदा यांच्याकडे दिलेला पहीला अर्ज मी वाचलेला नाही. सदर अर्जाच्या अनुषंगाने तहसिलदार यांनी पारीत केलेला निकाल मी वाचला आहे. हे म्हणणे खरे नाही की, तहसिलदार यांनी प्रतिवादींच्या सांगण्यावरून बेकायदेशिर आदेश पारीत केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, परिच्छेद क्र.१७ मधील मजकुर खोटा कथन केला आहे व परिच्छेत क्र.१८ मध्ये नमुद दस्तऐवज बेकायदेशिर असून केवळ दिशाभुल करण्यासाठी दाखल केले आहेत. हे

म्हणणे खरे नाही की, वादीच्या शेतातुन रस्ता अस्तीत्वात नसल्याने वादीला मनाई हुकूम मागण्याचा अधिकार आहे.

**प्रश्न**– पांडूरंग व धनसिंग हे वादीचे सख्खे मामभाउ नाहीत?

**उत्तर**–मामेभाउ आहेत.

हे म्हणणे खरे नाही की, वादीच्या शेतातुन रस्ता मिळविण्यासाठी मी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे आहे की, वादांकीत रस्ता झाल्यास वादीच्या शेताच्या तिन्ही बाजूने रसता अस्तीत्वात येतो. हे म्हणणे खरे आहे की, रस्त्याच्या दोन्ही चाको–या वादीच्या शेतातुन आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादांकीत रस्त्यामुळे वादींचे अंदाजे दिड बिघा शेताचे नुकसान होते. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र दाखल करून आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत

दि.२३/०८/२०२३.　　　　　दिवाणी न्यायाधीश क.स्तर यावल.